विदर्भ कोकण ग्रामीण बँक
Vidharbha Konkan Gramin Bank
भारत सरकार, बँक ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
Govt. of India, Bank of India & Govt. of Maharashtra Undertaking

**VKGB/RO/YTL/A&S/GKK/2017-18/388** **Date:-25.07.2017**

**बँकेच्या शाखा कार्यालयासाठी इमारत भाडयाने घेण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे**

विदर्भ कोकण ग्रामीण बँकेला स्वत:च्या प्रस्तावित खालील शाखांसाठी/कार्यालयासाठी इमारतीची आवश्यकता आहे. इमारत तळमजल्यावर / पहिल्या मजल्यावर ,पुरेशी पार्किंग सुविधा, व्हीसॅट सयंत्र बसविण्यासाठी जागा ,पाणी व महिला व पुरुषांकरिता स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय व सर्व सोयींनी युक्त असावी. इमारतीचे बांधकाम पूर्ण: झालेले असावे. इमारती/ जागे संबंधात कुठल्याही प्रकारचा वाद नसावा. फक्त जागा मालकांनीच प्रस्ताव पाठवावे.

प्रस्तावित शाखेचे ठिकाण पत्ता व अपेक्षित चटई क्षेत्र खालीलप्रमाणे.

| प्रस्तावित शाखेचे ठिकाण | तहसील/जिल्हा | अपेक्षित चटई क्षेत्र | अर्ज पाठवायचे ठिकाण क्षेत्रीय कार्यालय |
|---|---|---|---|
| देवळी | देवळी / वर्धा | १००० ते १५०० | यवतमाळ |
| मारेगाव | मारेगाव / यवतमाळ | ८०० ते १२०० | यवतमाळ |
| उमरखेड | उमरखेड / यवतमाळ | १००० ते १५०० | यवतमाळ |
| बान्सी | पुसद / यवतमाळ | ८०० ते १२०० | यवतमाळ |
| कारंजा लाड | कारंजा लाड / वाशीम | १००० ते १५०० | यवतमाळ |

इच्छुक इमारत मालकांनी , दिलेल्या मुदतीत, विहित नमुन्यात, बँकेला प्रस्ताव सादर करावेत. इमारतीच्या प्रस्तावासोबत, जागेच्या, इमारतीच्या मालकीबाबतची कागदपत्रे व जागेचा/इमारतीचा मंजूर/प्रमाणित नकाशा, भाड्याने द्यावयाच्या जागेचा लेआऊट प्लॅन, इमारतीचा व आंतरिक भागाचे फोटोग्राफस जोडावे. शासकीय/निमशासकीय संस्थाच्या इमारतीचा प्रस्तावही स्वीकारल्या जाईल. अर्जाचा नमुना संबंधीत शाखेतून / क्षेत्रीय कार्यालयातुन प्राप्त करावा.

ठळक अटी पुढीलप्रमाणे -:

१. घरमालक जागा भाडे तत्वावर (lease) देण्यास तयार असावा.
२. भाडे पट्टाकरार कमीत कमी १० वर्षाकरिता राहील .
३. भाडे पट्टाकरार नोंदणीकृत करावा लागेल व त्याचा खर्च घरमालकास करावा लागेल.
४. शाखेत पाण्याची, स्वच्छतागृहाची व शाखेच्या इमारतीवर व्हीसॅट सयंत्र बसविण्यास सुविधा उपलब्ध असावी. इतर अटी लागू राहील.

सिलबंद प्रस्ताव क्षेत्रीय प्रबंधक, विदर्भ कोकण ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय, यवतमाळ येथे **१६ ऑगस्ट २०१७** या तारखेपर्यंत पोहचेल अश्या पद्धतीने पाठवावे. पाकिटावर **"विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या __________ शाखेसाठी भाडेतत्वावर इमारत देण्यासाठी प्रस्ताव"** असा उल्लेख करावा. प्रस्ताव दाखल करावयाच्या अंतिम तारखेस सुट्टीचा दिवस असल्यास किंवा सुट्टी जाहीर झाल्यास प्रस्ताव पुढील कामकाजाच्या दिवशी स्वीकारण्यात येईल. त्या नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कुठलेही कारण न कळविता प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचा अधिकार बँक राखुन ठेवीतआहे . कृपया याची नोंद घ्यावी.

- क्षेत्रीय प्रबंधक
  यवतमाळ क्षेत्र